MHNB080006392024

**सं. फौ. ख. क्र. ३५२/२०२४**
**सरकार वि. राजुभाई रमेशभाई काथुड व इतर ५**
**निशाणी क्रमांक १८/ पुढे**

**न्यायनिर्णय**

**(घोषित दिनांकः ३० जुलै, २०२६)**

अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एन.एस.भिंगारदिवे व आरोपीतर्फे विधीज्ञ पी.जी.गावीत यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. अभियोगपक्षाची केस व आरोपीचा बचाव या अनुषंगाने खालील नमुद मुद्दे निर्णीत करण्याकरिता उपस्थित झाले आहेत व मी माझा निष्कर्ष या खालील दिलेल्या कारणांकरिता पुढील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक १३.०२.२०२४ रोजी १३.२० वाजेच्या सुमारास मौजे लक्कडकोट गावात बंगलाफळी भागात एका बंद घराच्या आडोश्याला आरोपीं स्वतःचे आर्थीक फायद्यासाठी अंकसटयाचा पैसे लावुन टाईम बाजार नावाचा जुगाराचा खेळ अवैधरित्या खेळतांना आढळुन आला त्यामुळे त्यांनी कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्यांन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

०२. अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द दोषारोप सिध्द करणेकामी फिर्यादी साक्षीदार क्र. १ समाधान शिवाजी केंद्रे यांना निशाणी क्र. १८ पुढे तपासले, साक्षीदार क्र.२ पोलिस शिपाई संजय भाईदास बोरसे यांना निशाणी क्र. १८ पुढे तपासले आणि पंच साक्षीदार क्र.३ विलास कातुड्या गावीत यांना निशाणी क्र.०७ पुढे तपासले, प्रस्तुत प्रकरणात फिर्याद (निशाणी क्र २०), घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.२१) हे दस्त फिर्यादी साक्षीदाराने शाबीत केलेले आहेत. इतर साक्षीदारांना वारंवार समन्स व वारंट काढुन देखील ते साक्षीकामी प्रकरणात हजर झाले नाही. निशाणी क्र १ वरील आदेशाप्रमाणे सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

### मुद्दा क्रमांक १ करिताः

०३. आरोपी विरुध्द ठेवलेला दोषारोप सिध्द करणेकरिता आरोपी हे सार्वजनिक ठिकाणी प्रतिबंधीत असलेला जुगाराचा प्रकार खेळतांना अढळुन आलेत ही बाब अभियोग पक्षाला सर्वसंशयापलीकडे सिध्द करणे गरजेचे आहे.

०४. साक्षीदार क्र. १ समाधान शिवाजी केंद्रे हे प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी असुन त्यांनी त्यांचे साक्षीत असे कथन केले की, दिनांक १३.०२.२०२४ रोजी ते नवापुर पोलिस ठाणे येथे कार्यरत होतो. त्यादिवशी ते, पोलिस उपनिरीक्षक भाऊसाहेब लांडगे, असई युवराजसिंग परदेशी, पोहेकॉ दादाभाई वाघ, पोशि किशोर

वळवी, पोशि संजय बोरसे असे पोलिस स्टेशनला हजर असतांना पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, लक्कडकोट बंगलाफळी येथे एका बंद घराच्या आडोश्याला काही इसम टाईम बाजार नावाचा अंक सटयांचा जुगार खेळत व खेळवित आहे. सदर माहितीप्रमाणे ते व पोलिस पार्टी पंचासह खाजगी वाहनाने बातमीच्या ठिकाणी गेले. असई युवराजसिंग परदेशी यांनी दोन इसमांना पंच म्हणुन राहण्यास विनंती केली. त्यांनी संमती दर्शविली होती. त्यानंतर ते सर्व बातमीच्या ठिकाणी गेले. तेथे काही इसम बंद घराच्या आडोश्याला काहीतरी लिहतांना दिसले. त्यांनी त्यांच्यावर १३.३० वाजेच्या सुमारास छापा टाकला व त्यांना जागीच पकडले. त्यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव राजुभाई रमेशभाई कातुड, विनु विसऱ्या गावीत, प्रविण काळु गावीत, ईश्वर नुरजी गावीत, नवग्या इसऱ्या कातुड असे सांगितले. त्यांनी सदरची पिढी ही अजय ठाकुर गामीत याच्या मालकीची असल्याचे सांगुन तेथे ते काम करतात व सदर चिठ्या ह्या व्हॉटसअप द्वारे त्याच्या मोबाईलवर पाठवतो असे सांगितले. त्यांनी त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या कब्जातुन एक टाईम बाजार नावाचे पुस्तक व त्यावर अंक व पैसे लावलेले, एक बॉलपेन व ११,१२०/– रुपये रोख व जुगाराचे सामान मिळुन आला होता. त्यानंतर असई युवराजसिंग परदेशी यांनी जप्ती पंचनामा (नि.क्र.२१) तयार केला होता. त्यानंतर ते तुम्हाला व जप्त मुद्देमाल घेऊन पोलिस ठाण्यात आले. त्यानंतर फिर्यादीने आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली होती. साक्षीदार क्र.२ संजय भाईदास बोरसे हे छाप्यातील साक्षीदार असुन त्यांनी फिर्यादी साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीस पुष्टी दिलेली आहे. प्रस्तुत साक्षीदारांनी उलटतपासात गुप्त माहीतीच्या खात्रीसाठी नकली गिऱ्हाईक पाठविले नसल्याचे व त्यांना घराचा क्रमांक व मालकाचे नाव सांगता येणार नाही आणि कोणत्या इसमाने कोणत्या आकडयावर किती पैसे लावले हे त्यांना सांगता येणार नाही असे कथन केले असुन आरोपीचे विधीज्ञांनी विचारलेले उत्तरसुचक

प्रश्नांना त्यांनी नकारलेले आहे.

०५. साक्षीदार क्र ३ विलास कातुड्या गावीत हे प्रस्तुत प्रकरणातील पंच साक्षीदार असुन त्यांनी त्यांचे साक्षीत असे कथन केले की, दिनांक १३.०२.२०२४ रोजी त्यांना पोलीसांनी बोलविले होते. पोलिसांनी त्यांची एका कागदावर सही घेतली होती. ते पोलिसांसोबत कोठेही गेले नव्हते. पोलिसांनी त्यांच्यासमक्ष काहीही जप्त केले नाही. तसेच, त्यांनी पंचनाम्यावरील सही मान्य केली आहे मात्र पंचनाम्यातील सखोल मजकुर त्यांना माहिती नसल्याचे कथन केले आहे. सहा. सरकारी विधीज्ञ यांनी सदरील साक्षीदारास फितुर घोषीत करुन उत्तरसुचक स्वरुपात प्रश्न विचारले. परंतु साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. त्यांना पंचनाम्यासाठी बोलविले नसल्याचे त्यांनी कथन केल्यामुळे सदरील प्रकरणात घटनास्थळ व जप्तीपंचनामा सिध्द झालेला नाही. जप्त मुद्देमाल हा आरोपीचे ताब्यातुन जप्त केला ही बाब सर्वसंशयापलिकडे सिध्द करण्यास अभियोगपक्षास अपयश आलेले आहे.

०६. सदरील प्रकरणात अभियोगपक्षास पुरेशी संधी देऊनही तपासी अंमलदार व कार्यवाही वेळी हजर असलेले इतर पोलीस साक्षीदार यांची साक्ष देखील नोंदविलेले नाही. अजुन असे की, अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. १ व २ या व्यतिरिक्त इतर साक्षीदाराही पोलीस साक्षीदार आहेत. पंच साक्षीदार क्र. ३ यांनी अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे जरी अभियोपक्षातर्फे इतर साक्षीदार तपासले असले तरी पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य न केल्यामुळे गुन्हा शाबित होऊ शकत नाही. त्यामुळे केवळ पोलीस कर्मचाऱ्यांचे साक्षीवर विसंबुन राहुन आरोपी हे प्रतिबंधीत जुगाराचा खेळ खेळतांना जुगाराचा साधनासह अढळून आले असे म्हणता येणार नाही कारण त्यांचे समोर आरोपीचे ताब्यातुन जुगाराची साधने व रोख रक्कम जप्त करण्यात आली असे अभियोगपक्षाचे कथन जरी असले तरी

पंच साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. अशा परिस्थितीत फक्त पोलीस कर्मचारी यांचे साक्षीवर विसंबुन राहुन तथाकथीत गुन्हा आरोपींविरुध्द सिध्द होत नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक २ करिताः**

०७. यापूर्वीच मुद्दा क्र. १ मध्ये चर्चा केल्याप्रमाणे अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेला साक्षीपुरावा आरोपी यांनी गुन्हा केला असे सिध्द करित नाही. आरोपी हे दोष मुक्ततेस पात्र आहे. सबब मुद्दा क्रमांक २ चे उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १ | आरोपी क्र.(१) **राजुभाई रमेशभाई काथुड,** क्र.(२) **विनु ईसऱ्या गावीत**, क्र.(३) **प्रविण काळु गावीत,** क्र.(४) **ईश्वर नुरजी गावीत,** क्र.(५) **नवग्या ईसऱ्या काथुड** आणि क्र.(६) **अजय ठाकर गामीत** यांची कलम २५५(१) फौजदारी प्रक्रीया संहिता (भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१)) प्रमाणे महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये कलम १२(अ) चे आरोपा मधुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २ | आरोपींचे वयैक्तीक जातमुचलका व हमीपत्र रद्द करण्यात येते |
| ३ | भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०० फौ.प्र.सं.मधील तरतुदी विचार करता जप्त मुददेमाल एक अंकसटयाची चिठ्ठी, एक बॉलपेन हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावे. तसेच, जप्त रोख रक्कम रु.११,१२०/–चलनाद्वारे बॅकेत जमा केले असून अपील |

| | |
|---|---|
| | कालावधीनंतर सरकार जमा करण्यात यावी. |
| ४ | आरोपीने कलम ४३७ (अ) फौजदारी प्रक्रिया संहिते (भारतीय नागरीक सुरक्षा कलम ४८१) प्रमाणे प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/- वैयक्तीक बंधपत्र सादर करावा.<br>(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला). |

Digitally signed by DEORE DHANANJAY SHIVAJI
Date: 2026.07.30 17:04:43 +0530

ठिकाण – नवापुर. **(धनंजय एस. देवरे)**

दिनांक – ३०.०७.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र. २.

नवापुर.

## <u>दाखला</u>

दाखला देण्यात येतो की, पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | मयुर धर्मराज पाटील,<br>लघुलेखक (श्रेणी–२), |
| न्यायालयाचे नांव | | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नवापूर, |
| न्यायनिर्णय जाहीर केल्याचे दिनांक | – | ३०.०७.२०२६ |
| आदेशावर न्यायाधीशांनी स्वाक्षरी केल्याचे दिनांक | – | ३०.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचे दिनांक | – | ३०.०७.२०२६ |